# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.06.2026** **वारःगुरुवार**

1. -राज्याचं 'क्वांटम आणि डीप टेक' धोरण लवकरच आणण्यात येणार
2. -'बालस्नेही पंचायत' आणि 'जलसमृद्ध पंचायत' या दोन प्रमुख श्रेणींसह विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातल्या ग्रामपंचायतींना राष्ट्रीय पुरस्कार
3. -मराठा आरक्षणासंदर्भात कक्षाची स्थापना आणि
4. -पर्यावरणासोबत आरोग्यासाठी सायकल चालविण्याच्या उपक्रमांचं राज्यभरात आयोजन

**धोरण**

महाराष्ट्राला अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात देशात अग्रस्थानी नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पहिल्या 'महाराष्ट्र क्वांटम धोरण' आणि 'महाराष्ट्र डीप टेक' धोरण यांना मान्यता दिली आहे. संपूर्ण डीप टेक परिसंस्थेसाठी व्यापक धोरण राबविणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल वर्षा निवासस्थानी या धोरणांसंदर्भात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. राज्यात संशोधन, नवोन्मेष, गुंतवणूक आणि उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ही दोन्ही धोरणं महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. महाराष्ट्राला जागतिक तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचा हा भाग आहे.

**पंचायत पुरस्कार**

'बालस्नेही पंचायत' आणि 'जलसमृद्ध पंचायत' या दोन प्रमुख श्रेणींसह अन्य विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील ग्रामपंचायतींना काल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आलं.

केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या वतीनं आयोजित 'राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2025' मध्ये केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंह, यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते विविध श्रेणींतील पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

दारिद्र्य निर्मूलन,आरोग्य,बालकल्याण,जलसंधारण,स्वच्छता,पायाभूत सुविधा,सामाजिक न्याय, पारदर्शक प्रशासन आणि महिला सक्षमीकरण या नऊ प्रमुख विषयांवर आधारित कार्याचं मूल्यमापन करून पंचायतींना गौरविण्यात आलं.

भंडारा जिल्ह्यातील इटगाव पुनर्वसन ग्रामपंचायतीनं 'बालस्नेही पंचायत' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक मिळवत 1 कोटी रुपयांचं पारितोषिक पटकावलं.बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल या ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला.

रायगड जिल्ह्यातल्या खारीवली ग्रामपंचायतीनं 'जलसमृद्ध पंचायत' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक मिळवत 1 कोटी रुपयांचा पुरस्कार प्राप्त केला. जलसंधारण आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील प्रभावी उपक्रमांमुळं या ग्रामपंचायतीला हा सन्मान मिळाला.

नाशिक जिल्ह्यातील निंबळे ग्रामपंचायतीनं सुशासन पंचायत श्रेणीत देशात द्वितीय क्रमांक मिळवत 75 लाख रुपयांचं पारितोषिक प्राप्त केलं.तसंच, रायगड जिल्ह्यातील चांभारली ग्रामपंचायतीनं 'सामाजिक न्याय आणि सामाजिक सुरक्षा' या श्रेणीत द्वितीय क्रमांकासह साडे सदतीस लाख रुपयांचा सन्मान प्राप्त केला.

याप्रसंगी पुरस्कारप्राप्त पंचायतींच्या उल्लेखनीय कार्यावर आधारित विशेष ई-पुस्तकाचं अनावरण करण्यात आलं. काही निवडक पंचायतींच्या उत्कृष्ट कार्यावर आधारित माहितीपटही यावेळी प्रदर्शित करण्यात आला.

**आरक्षण**

मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी काल मुंबईत दिली. मंत्रालयात मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीनंतर ते बोलत होते.

आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणं, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये मदतवाहिनी (हेल्पलाईन) क्रमांक सुरू करण्यात येणार आहे; तसंच प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातल्या कार्यालयात 93 26 56 28 15 हा मदतवाहिनी (हेल्पलाईन) क्रमांक सुरू केला असून कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल असं त्यांनी सांगितलं.

**विपनि**

विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्वच्या सर्व 17 अधिकृत उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काल मुंबईत व्यक्त केला. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत चव्हाण बोलत होते.यावेळी चव्हाण यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली.

**नाशिक**

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुकीसाठी समज-गैरसमजातून अर्ज दाखल करण्यात आले आहेत, ते अर्ज बंडखोर मागे घेतील आणि महायुतीचेच उमेदवार विजयी होतील असा दावा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. सामंत यांनी काल नाशिकमध्ये शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर हा दावा केला.

**नागपूर**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारची कर्जमाफी ही केवळ दिखावा असून शेतकऱ्यांना त्याचा प्रत्यक्ष फायदा होणार नाही, असा आरोप केला आहे. ते काल नागपूर इथं बोलत होते. ही कर्जमाफी मार्च महिन्यापूर्वीच जाहीर होणं आवश्यक होतं. सरकारनं दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी त्यापेक्षा जास्त रक्कमेचं कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनी उर्वरित रक्कम कुठून भरायची, हा मोठा प्रश्न आहे असं ते म्हणाले.

**नागपूर**

नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार म्हणून घोषित करण्यात आलं आहे. या निर्णयामुळं नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आनंदाचं वातावरण निर्माण झालं असून शेतकरी आणि व्यापारी वर्गामध्ये समाधान व्यक्त केलं जात आहे. नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दरवर्षी चार लाख मेट्रिक टनांहून अधिक कृषीमालाची उलाढाल होते. तसंच देशातील अकरा राज्यांतून इथं कृषीमालाची आवक होत असते.

**हिंगोली**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या समन्वयानं, हिंगोली जिल्ह्यात 1 जून ते 30 जून  या कालावधीत 'शेत वाचवा अभियान' युद्धपातळीवर राबविण्यास सुरुवात झाली आहे.  या अभियानाची मुख्य संकल्पना 'सुदृढ मृदा-समृद्ध पीक-आनंदी शेतकरी' ही आहे.  हिंगोलीच्या कृषिविज्ञान केंद्राच्या वतीनं जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये या मोहिमेचं नियोजन करण्यात आलं आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय मृदा विज्ञान संस्थेच्या अहवालानुसार, हिंगोली जिल्ह्याचा समावेश देशातील 'उच्च खत वापर आणि मध्यम ते उच्च सुपीकता' असलेल्या विशेष 246 जिल्ह्यांमध्ये करण्यात आला आहे. हिंगोलीच्या मातीत स्फुरदचं प्रमाण आधीच पुरेशा प्रमाणात साचलेलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी डाळिंब, सोयाबीन, हळद किंवा इतर पिकांसाठी 'डीएपी'  खताचा अवाजवी आणि अंधाधुंद वापर तातडीनं थांबवावा अशी शिफारस आयसीएआरनं केली आहे. त्यानुसार, हिंगोलीतील मराठवाडा भागात स्फुरदाच्या रासायनिक मात्रेमध्ये 25 टक्क्यांपर्यंत कपात करून, त्याऐवजी पीएसबी आणि 5 टन प्रति हेक्टरी शेणखताचा वापर केल्यास पिकाचं उत्पादन घटत नाही आणि जमिनीचं आरोग्यही टिकून राहतं असा सल्ला कृषिविज्ञान केंद्र, हिंगोलीचे जिल्हा समन्वयक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ पी. पी. शेळके यांनी दिला आहे.

**<u>कांदा-बियाणे</u>**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बियाणे विक्री केंद्रात फुले समर्थ या वाणाच्या कांदा बियाण्याची विक्री काल सुरू करण्यात आली. या वाणाला त्याच्या आकर्षक लाल रंगामुळे बाजारामध्ये इतर कांदा वाणापेक्षा जास्त बाजारभाव मिळत असल्याचं कुलगुरु डॉक्टर खर्चे यांनी सांगितलं. कांदा बियाण्याची विक्री व्यवस्था ही कांदा बियाणे शिल्लक असेपर्यंत चालू राहणार आहे.

**<u>बीड</u>**

बीड जिल्ह्यात माजलगांव इथं बकरी ईदच्या दिवशी सुमारे चारशेहून अधिक गोवंशाची निर्दयी आणि अमानुषपणे हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा तातडीनं तपास करून दोषींवर कडक कारवाई करावी असे निर्देश पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

**<u>हिंगोली</u>**

जागतिक सायकल आणि पर्यावरण दिनानिमित्त राज्याच्या विविध भागात सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं.

हिंगोली इथं 'सायकल चालवा, भविष्य घडवा', 'पर्यावरण वाचवा, आरोग्य जपा', 'झाडं लावू या.. जगवू या' अशा घोषणा देत शहरातल्या पर्यावरणप्रेमी नागरिकांच्या वतीनं भव्य सायकल फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये शहरातील डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, महिला आणि युवक-युवती मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<u>परभणी</u>**

पर्यावरणासोबत आरोग्यासाठी सायकल चालविणं लाभदायक आहे ही जाणीव नागरिकांमध्ये निर्माण करण्यासाठी परभणी शहरामध्ये माय भारत आणि परभणी सायकल क्लबच्या वतीनं सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं.

**<u>गडचिरोली</u>**

गडचिरोली पोलिस विभागाच्या वतीनं शहरात काढण्यात आलेल्या सायकल फेरीमध्ये पोलिस अधिकारी, अंमलदार, नागरीक आणि विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन निरोगी जीवन आणि पर्यावरणाचा संदेश दिला. बदलत्या परिस्थितीनुसार, प्रत्येकानं किमान एक दिवस सायकलचा वापर करावा असं आवाहन पोलिस अधीक्षकांनी यावेळी केलं.

**भंडारा**

भंडारा जिल्ह्यात तुमसर इथल्या सिरीनबाई नेत्रावाला स्कूल, माडगी या शाळेत आरटीई प्रवेश प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार आणि बोगस प्रवेशांविरोधात पीडित पालकांनी प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन पुकारलं आहे. खोटे पत्ते आणि बोगस कागदपत्रं सादर करून श्रीमंतांना प्रवेश देण्यात आला, तर गोरगरीब आणि हक्काच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारण्यात आल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या प्रकरणी तक्रार करून 15 दिवस उलटूनही कोणतीही कारवाई न केल्यानं पालकांनी तुमसर पंचायत समितीसमोर ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे.

**गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील लॉयड्स स्पोर्ट्स अकादमीच्या विद्यार्थ्यांनी गोव्यात आयोजित पहिल्या अखिल भारतीय इनडोअर तिरंदाजी स्पर्धेत सुवर्ण आणि रौप्य पदकांची कमाई केली. ही स्पर्धा गोवा हौशी तिरंदाजी संघटनेतर्फे आयोजित करण्यात आली होती.

**सांगली**

कोयना धरणातला उपलब्ध पाणीसाठा पुरवणं अत्यावश्यक असल्यानं सातारा आणि सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील कोयना धरण ते हरिपूर हद्दीपर्यंत 4 ते 7 जूनपर्यंत शेतीसाठी खासगी उपसा करणाऱ्या आणि बिगर सिंचन सर्व योजनांवर पाणी उपसा बंदी करण्याचा आदेश सांगली पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सीमा मोहिते यांनी काढला आहे.

**हवामान**

सांगली जिल्ह्यातील विविध तालुक्यात काल दुपारी अचानक आलेल्या पावसामुळं नागरिकांची तारांबळ उडाली. पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाला.

राज्याच्या चारही विभागात तुरळक ठिकाणी वीजा, जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.